**महाराष्ट्र शासन - वन विभाग**
**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**
**मु.पो.- कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा- सांगली-४१६३०९**
**दूरध्वनी क्रमांक -०२३४६- २७१२१२ ई-मेल -princpalkundal@gmail.com**

## सेवानिवृत्त अधिकारी यांची विवक्षित कामांसाठी सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेकामी जाहिरात

कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल, येथे वन विभागातून विभागीय वन अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षक या पदांवरून सेवानिवृत्त झालेले अधिकारी यांचेमधून खालील नमूद विवक्षित कामाकरीता नेमणूक करावयाची आहे.त्याकामी नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणारे सेवानिवृत्त अधिका-यांचे अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | पद संख्या |
|---|---|---|
| १ | कुंडल वन अकादमीमध्ये वन विभाग तसेच राज्य शासनाच्या विविध विभागामधील सर्व संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी पायाभूत, उजळणी व पदोन्नती नंतरचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणेकामी सत्र संचालक म्हणून काम करणे. विविध विषयावर व्याख्याने देणे. राज्यातंर्गत तसेच संपूर्ण देशभरात प्रशिक्षणार्थी यांच्या अभ्यास दौ-याचे नियोजन करुन, त्यानुसार कार्यवाही करणे. | ०२ |

**अर्ज सादर करण्याचा कालावधी :-**

**दिनांक २२.०७.२०२४ ते दिनांक ३१.०७.२०२४ अखेर (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** पर्यंतचा आहे. सदरचा अर्ज हा खालील पत्त्यावर लिखित स्वरुपात समक्ष, पोस्टाव्दारे अथवा ईमेलव्दारे सादर करावा. तसेच अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, सेवानिवृत्तीचा आदेश **(Pension Payment Order)** व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. याव्यतिरिक्त अर्जासोबत सेवानिवृत्ती वेळी मिळत असलेल्या वेतनाचा तपशिल जोडावा.

**अर्ज सादर करणेचा पत्ता** :-

महासंचालक,कुंडल विकास,प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल,क्रांती सहकारी साखर कारखानाशेजारी,कुंडल- विटा रस्ता, ता. पलूस, जि.सांगली, पिन- ४१६३०९.

**अटी व शर्ती** :-

१. उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या विवक्षित कामासाठीचा अर्जदार हा वनविभागातून विभागीय वन अधिकारी व सहाय्यक वनसंरक्षक या पदावरून सेवानिवृत्त झालेला असावा.

२. विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांची निवड प्रक्रिया व नियुक्ती करताना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ मधील तरतुदींचा अवलंब करण्यात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडे विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असावा.

४. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी हा शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

५. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्याही विभागीय चौकशी सुरू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

६. सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरूपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात येत असलेने, सबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे/सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

७. कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे निवासी प्रशिक्षण आयोजित केले जात असलेने, संबंधितांना कुंडल वन अकादमीमध्ये निवासस्थानी राहणे अनिवार्य राहील.

८. सदरची सेवा ही करार पध्दतीने असल्याने, नियुक्तीची सेवा समाप्त करण्याचा अधिकार महासंचालक,कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल यांना राहील.

९. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी हा सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.

१०. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी गुंतलेले हितसंबंध (Conflict of Interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

११. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांना प्राप्त होणा-या माहिती/कागदपत्रे/आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१२. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक राहील.

१३. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/ प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६ अन्वये विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती तसेच विभागाने वेळोवेळी निश्चित केलेल्या सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२७१५/प्र.क्र.-१०० (भाग-१)/१३, दिनांक ०८.०९.२०२३ मधील तरतुदीनुसार मासिक व पारिश्रमिक भत्ते देण्यात येतील.

सही/-

**(एन. आर. प्रविण, भा.व.से.)**
**महासंचालक**
**कुंडल विकास,प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**

**महाराष्ट्र शासन - वन विभाग**

**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**

**मु.पो.- कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा- सांगली-४१६३०९**

**दूरध्वनी क्रमांक -०२३४६- २७१२१२ ई-मेल -princpalkundal@gmail.com**

## सेवानिवृत्त अधिकारी यांची विवक्षित कामांसाठी सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेकामी अर्जाचा नमुना

**रंगित फोटो**

प्रति,

महासंचालक,

कुंडल, विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल

विषय- विवक्षित कामांसाठी सेवा करार पध्दतीने नेमणूक करणेकामी

संदर्भ- दैनिक................................. दिनांक...........................मधील जाहिरात.

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असून माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नाव :-

२. जन्मतारीख (अंकी व अक्षरी ):-

३. संपूर्ण पत्ता :-

४. मोबाईल क्रमांक :-

५. ई-मेल आयडी :-

६. शैक्षणिक पात्रता :-

७. सेवानिवृत्त अधिकारी यांचे मूळ पदनाम :-

८. शासकीय सेवेतील रुजू दिनांक :-

९. शासकिय सेवेतील सेवानिवृत्तीचा दिनांक :-

१०. सेवानिवृत्ती वेळचे निवृत्ती वेतन :-

११. अनुभव :-

ठिकाण :-

दिनांक :- अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

(टिपः अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, अनुभव, सेवानिवृत्ती आदेश (P.P.O.) व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. याव्यतिरिक्त अर्जासोबत सेवानिवृत्ती वेळी मिळत असलेल्या वेतनाचा तपशिल जोडावा.)